# 'शाळांगण' प्रकल्पांतर्गत उन्हाळी शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

वडगाव धायरी : रयत शिक्षण संस्थेच्या नारायणराव सणस विद्यालयात, क्विक हील फाउंडेशन व पंख संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ९वीच्या विद्यार्थ्यांकरीता 'शाळांगण' प्रकल्पांतर्गत उन्हाळी शिबिर मोठ्या उत्साहात राबवण्यात आले. यावेळी प्रथम कार्यक्रमाची सुरुवात अनिकेत यादव यांनी विद्यार्थ्यांना शिवाजीमहाराज आणि त्यांचे आरमार याबाबत चित्रफिती दाखवून केली. यावेळी इ. ५वीच्या अक्षय जोगदंड याने शिवाजी महाराजांची कीर्ती आपल्या शब्दांत मांडली आणि सर्वांची मने जिंकली. तसेच १२वी तील ओंकार इंगवले याने ढोलकी वादनाने सर्वांचे मनोरंजन केले. विद्यार्थ्यांसाठी 'मातीकाम' आणि 'पेपर पिशवी तयार करणे' या दोन कार्यशाळा राबविल्या. यात मातीपासून मडकी कशी बनवावीत, याचे मार्गदर्शन गणपत दळवी यांनी केले.